# शताब्दी होमरूल लिग आणि लखनौ कराराची

**प्रा. श्रुती भातखंडे**

*इतिहास विभाग प्रमुख, मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, गणेशखिंड, पुणे - १६*

भारतीय राष्ट्रीय चळवळ ही आधुनिक समाजाने पाहिलेली सर्वाधिक आम जनतेची चळवळ होती. सर्व वर्गाच्या आणि विचारप्रणालींच्या लाखो लोकांना राजकीय कृती करण्यास प्रोत्साहित केले. भारतीय राष्ट्रीय चळवळीचे विविध पैलू आहेत. अर्ध लोकशाही किंवा लोकशाही स्वरूपाच्या राजकीय व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्याचे किंवा तिच्या जागी दुसरी व्यवस्था प्रस्थापित करण्याचे भारतीय राष्ट्रीय चळवळ हे एकमेव ऐतिहासिक उदाहरण आहे.[१] भारतीय राष्ट्रीय चळवळ सार्वजनिक ध्येय असलेली अतिशय व्यापक चळवळ होती. सार्वजनिक उद्देश असलेल्या व्यापक चळवळीत मूलभूत प्रश्नांवर सखोल चर्चा केली जाई. मुक्त चर्चा आणि चर्चेने प्रश्न सोडविणे हे या चळवळीचे वैशिष्ट्य होते. त्यामुळे अनेक विचार प्रवाह एकत्र येऊनही प्रसंगी ताणतणावाचे प्रसंग निर्माण होऊन ही त्याच्यातील ऐक्यभावना कमी झाली नाही. स्वातंत्र्य आंदोलनाने आपल्याला आर्थिक, राजकीय आणि वैचारिक वारसा मिळाला आहे. ज्यामुळे स्वतंत्र भारताची वाटचाल केली त्याची पाळेमुळे त्यात सापडतात. या चळवळीने भारतात लोकशाहीच्या संकल्पना आणि संस्था यांना लोकप्रियता मिळवून दिली. स्वातंत्र्याची चळवळ ही आर्थिक विकासाची चळवळ बनली. या राष्ट्रीय चळवळीची धर्मनिरपेक्षतेशी बांधिलकी होती. चळवळीची दृष्टी कधीच संकुचित नव्हती. चळवलीच्या नेत्यांनी व्यापक आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन आत्मसात केला होता. राष्ट्रीय चळवळीने इतिहासाच्या प्रक्रियेत मध्यवर्ती भूमिका बजावली त्यामुळे भारतीयांचे राष्ट्रात रुपांतर होऊ शकले ही साम्राज्यवादाच्या विरोधातील चळवळ होती.

१८८५ मधे झालेली राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना ही आकस्मिक घटना किंवा ऐतिहासिक अपघात नव्हता. राष्ट्रीय जागृतीचा तो परमोच्च बिंदू होता. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेचे पर्यावसान राष्ट्रीय राजकीय चळवळीत झाले. १८५७ च्या उठावात अपयश आल्याने भारतीय समाजात आत्मपरीक्षणाची प्रक्रिया सुरू झाली. १८व्या शतकात युरोपात एक नवी बौद्धिक लाट आली आणि त्याचा परिणाम होऊन जागृतीचे नवे युग सुरू झाले. नव्या तर्कवादी आणि संशोधन वृत्तीने युरोपियन समाजाला नवी प्रेरणा मिळाली. विज्ञानामुळे आणि वैज्ञानिक दृष्टीकोनामुळे राजकीय, लष्करी, आर्थिक, धार्मिक अशा सर्वच क्षेत्रांना प्रभावित केले. पाश्चात्य शिक्षण घेणे. नवशिक्षित वर्ग तर्कवाद, विज्ञानवाद, मानवतावाद यांनी प्रभावित झाला होता. ज्ञानाच्या या प्रसारामुळे भारतात ही पुनरूज्जीवनाची भावना जागृत झाली आणि भारतीय समाजात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी सुरू झाल्या. त्यातून देशाचा, समाजाचा चेहरा बदलत गेला. त्याचे प्रतिसाद वेगवेगळ्या स्वरूपात आणि प्रदेशात स्थापन झालेल्या संस्था आणि समाज सुधारक यांच्या प्रयत्नातून दिसून आला त्याचे फलीत म्हणजे राष्ट्रीय सभेची स्थापना हे होते. याचे श्रेय ए.ओ. ह्यूम यांना दिले जाते व लॉर्ड डफरिन ने कॉंग्रेस (राष्ट्रीय सभेला) मूर्त रूप देण्यात मदत केली. शासक (ब्रिटिश) शासित (भारत) यांच्यातील अंतर वाढत होते. ब्रिटिश साम्राज्याची सुरक्षितता हा महत्त्वाचा हेतू राष्ट्रीय सभेच्या स्थापनेने पूर्ण होणार होता. सुरक्षा झडप म्हणून राष्ट्रीय सभेने काम करावे हा ब्रिटिशांचा हेतू साध्य होणार होता. राष्ट्रीय सभेच्या कामकाजाचे तीन विभाग पडतात. १९८५ ते १९०५ नेमस्त / मवाळ कालखंड, १९०५ ते १९९० जहाल कालखंड, क्रांतीकारकांचे कार्य, १९२० ते १९४७ गांधी युग अर्ज, विनंत्या, ठराव, चर्चा, लेख, पत्रके हा नेमस्तांचा मार्ग होता. ब्रिटिशांच्या न्यायी वृत्तीवर, समानतेच्या तत्त्वावर आणि त्यांच्या लोकशाहीवर निष्ठा असणाऱ्या नेमस्त नेत्यांनी ब्रिटिश राजवट ईश्वरी वरदान आहे ही भावना जपली होती, परंतु त्यांच्या प्रयत्नांना अपयश येत होते. असे अपयश येऊनही नेमस्तांनी राष्ट्रीय चळवलीचा पाया पक्का केला. आधुनिक भारताच्या निर्मितीत त्यांचे योगदान मोठे आहे. १९०५ ते १९२० या जहालवादी कालखंडात प्रामुख्याने लो.टिळक, बिपीनचंद्र पाल आणि लाल लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळ जोरात व जहाल बनली. नेमस्तांचा शांततामय व सौम्य मार्ग त्यांना पसंत नव्हता. टिळकांनी स्वधर्मासाठी स्वराज्य आवश्यक आहे. स्वराज्याशिवाय सामाजिक सुधारणा होऊ शकत नाही, औद्योगिक क्रांती तसेच उपयुक्त शिक्षण मिळू शकत नाही. त्याशिवाय राष्ट्रीय जीवनाची परिपूर्णता नाही. आम्हाला हेच हवे आहे आणि त्यासाठी ईश्वराने ह्या पृथ्वीवर पाठविले आहे.[२]

बिपीनचंद्र पाल यांच्या मते, 'नव्या सुधारणा नव्हे तर पुनर्रचना देशाची मागणी आहे. एका परकीय सरकारने कोणतेही कायदे बनविण्याचा तसेच आपल्या मर्जीप्रमाणे शासन चालविण्याचा अधिकार सोडून दिला पाहिजे.[३] लाल लजपतराय यांच्या मते, 'आधुनिक परिस्थितीत भारताचे प्राचीन जीवन परिपूर्ण बनणे होय. ते स्वराज्याला राष्ट्रीय गौरवाचे सत्ययुग मानीत. ज्याचा भारत विश्वाचा गुरू बनून मार्गदर्शकाची भूमिका पार पाडील. वेदांताच्या आदर्शाप्रमाणे लोक अंतिम उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी स्वयंपूर्ण होतील ते खरे स्वराज्य होय.[४] अरविंद घोष राजकीय स्वातंत्र्याला राष्ट्राचा एक जीवनश्वास मानीत.

जहालांची स्वराज्याची मागणी म्हणजे परकीय नियंत्रणातून

पूर्ण स्वातंत्र्य आणि परकीय निर्बंध नसलेले आपल्या देशाचा कारभार चालविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होय. विदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशीचा पुरस्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि सत्याग्रह हा जहालांचा कार्यक्रम होता. सामाजिक दृष्ट्या जहाल विचारसरणीचा उदय म्हणजे प्रतिक्रियावादी विकास होता. हा काळ आंतरराष्ट्रीय स्तरावर ही राजकारणात स्थित्यंतरे घडून येण्याचा होता. पहिल्या महायुद्धाची १९१४ मधे सुरुवात झाली होती. त्यामुळे इंग्लंड युद्धात गुंतले असताना आपली स्वराज्याची मागणी सातत्याने करून त्याचा पाठपुरावा केला तर ब्रिटिश सरकारला स्वयंशासन संस्थांची निर्मिती करणे भाग पडेल आणि संकटात सापडलेल्या ब्रिटिश सत्तेस सहकार्य करून त्या सहकार्याच्या मोबदल्यात भारतीय जनतेने स्वयंशासनाचे, स्वराज्याचे अधिकार मिळवावेत अशी संधी सोडू नये ह्यावर सर्वांचे एकमत झाले. सरकारवर जनतेचा दबाब आणल्याशिवाय काहीही साध्य होणार नाही या भावनेतून होमरूल लिग चळवळ सुरू करण्यात आली.

होमरूलचा शब्दश: अर्थ स्वराज्य असा होता. १९८५ पासून चाललेल्या इंग्रजांविरूद्धच्या भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील अनेक लहान मोठ्या सनदशीर आणि शांततापूर्ण आंदोलनाचे एक भाग म्हणजे होमरूल चळवळ होती.

जन्माने ब्रिटिश असूनही भारत हीच आपली कर्मभूमी मानून भारतातील जनतेसाठी त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्यासाठी बहुमोल योगदान दिले अशा ॲनी बेझंट यांचे होमरूल चळवळीत योगदान भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात चिरस्मरणीय आहे. डॉ. बेझंट यांना हिंदू धर्माबद्दल विशेष आकर्षण होते. १८८९-९१ मधे त्यांनी थिऑसॉफी या धर्मपंथाची दीक्षा घेतली. १८९३ मध्ये भारतात आल्यावर मादाम ब्लॅटिव्हस्की व कर्नल ऑल कॉय यांनी स्थापन केलेल्या थिऑसॉफीकल सोसायटीचे कार्य पुढे चालविले. अनेक धर्मांचा अभ्यास करून सर्वांपेक्षा हिंदू धर्मच श्रेष्ठ असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी धर्म प्रचारत व उपासक म्हणून कार्य करत असतानाच भारताच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या प्रचारासाठी शाळा व वसतीगृहे स्थापन केली. बनारस येथे सेंल हिंदू कॉलेज स्थापन केले. पुढे त्याचे रूपांतर बनारस हिंदू विद्यापीठात झाले. ॲनी बेझंट यांनी जी राजकीय भाषणे दिली त्यातून त्यांना भारताच्या स्वातंत्र्यप्रश्नाबाबत किती आस्था होती हे दिसून आले. ब्रिटिश जनतेची भारतीय स्वातंत्र्याबद्दल सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला. भारताला जनतेच्या पाठिंब्याने निवडून आलेले, आर्थिक स्वातंत्र्य असलेले व संसदेला जबाबदार असलेले सरकार म्हणजे स्वतंत्र सरकार मिळावे असे त्यांचे मत होते.[५] २५ सप्टेंबर १९१५ रोजी त्यांनी कॉंग्रेस अंतर्गत होमरूल लिग या संघटनेची स्थापना केली. आपल्या नव्या राजकीय उपपक्षाच्या प्रचारासाठी कॉमन विल आणि न्यू इंडिया ही वृत्तपत्रे सुरू केली. भारताचा राजकीय दर्जा उंचावल्याशिवाय खरी सुधारणा होणार नाही आणि मवाळांच्या हातून कॉंग्रेसची सुटका व्हावी असे त्यांना वाटत होते. भारतातील विविध प्रदेशात होमरूलच्या प्रचारार्थ त्यांनी दौरे काढले. ठिकठिकाणी त्यांच्या सभा गाजल्या. सर्वसामान्य भारतीय जनतेपर्यंत होमरूलची मागणी त्यांनी पोहोचविली. मुंबई, कानपूर, कालिकत, मद्रास, अलाहाबाद, बनारस, अड्यार, मदुराई या ठिकाणी होमरूल लिगच्या शाखा प्रस्थापित झाल्या. एका ब्रिटिश महिलेने अत्यंत आत्मीयतेने व तळमळीने भारताच्या कल्याणासाठी कार्य केले. हा अनुभव विलक्षण होता. १९१५ मधे टिळकांनी पुण्याला बोलाविलेल्या जहाल गटाच्या बैठकीस भारतातील अनेक ठिकाणांहून प्रतिनिधी आले होते. त्यात प्राथमिक स्वरूपाची चर्चा झाल्यावर एप्रिल १९१६ मधे बेळगाव येथे झालेल्या बैठकीत होमरूल लिगीच अधिकृत घोषणा करण्यात आली.[६] जॉर्ज अरूंडेल, जोसेफ बॅप्टिस्टा, न.चि. केळकर, डॉ. मुंजे, खापर्डे, करंदीकर यासारखे नेते प्रचारासाठी झटू लागले. मुंबई, वऱ्हाड, मध्यप्रांत हे टिळकांचे क्षेत्र राहिले. लोकप्रियता वाढल्याने होमरूलने कॉंग्रेसला मागे टाकले. राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व बेझंट व लो. टिळकांकडे आले.[७] ॲनी बेझंट यांनी अनेक पत्रके काढून जनजागृतीचे कार्य केले. त्यांनी लिहिलेल्या 'इंडिया ए नेशन' या पुस्तकाचे भाषांतर अनेक भाषांत झाले. ब्रिटिश सरकारला बेझंट यांची चर्चा धास्ती वाटू लागली. त्यांना व अरुंडेल व वाडिया यांना स्थानबद्ध करण्यात आले. सरकारची दडपशाही वाढली तसा चळवळीचा जोरही वाढला. मुस्लीम लीग व कॉंग्रेस पक्ष एकत्र आले. १९१७ मधे स्वराज्याची एकमुखी मागणी करण्यात आली. विना चौकशी अनेक नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले, चळवळ दडपली जावी हा सरकारचा निर्धार अपयशी ठरत होता. मद्रास न्यायालयाचे सरन्यायाधीश सर सुब्रह्मण्यम अय्यर यांनी ब्रिटिश सरकारने दिलेल्या सर या पदवीचा त्याग केला. २४ जून १९१७ रोजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी पत्र पाठवून १४ तत्त्वांनुसार लोकशाही शासनाची तत्त्वे भारताला लागू करावीत असे आवाहन केले. अय्यर यांच्या पत्राला वृत्तपत्रातून प्रसिद्धी मिळाली आणि अमेरिकेतही या पत्रांच्या प्रती वाटण्यात आल्या. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी नीतीवर कठोर टीका झाली. न्यूयॉर्क येथे होमरूल लिगची शाखा स्थापना करण्यात आले. अमेरिकेत होमरूलला पाठिंबा मिळावा म्हणून लाला लजपतराय, हर्डीकर आणि शास्त्री यांना पाठविण्यात आले. सॅन फ्रॅन्सिस्को येथे होमरूलची शाखा उघडण्यात आली. 'सेल्फडिटरमेशन फॉर इंडिया' या पुस्तिकांच्या ४००० प्रती विकल्या गेल्या.

लोकमान्य टिळकांनी होमरूलच्या प्रचारार्थ दौरे काढले. जमनादास, द्वारकादास, शंकरलाल बँकर, इंदूलाल याज्ञिक यांनी प्रादेशिक भाषांमधून भारतीय प्रचारकोश उभा केला.[८] राष्ट्रीय कॉंग्रेसमधील नेमस्तांच्या निष्क्रियतेवर नाराज असलेल्या अनेक नेमस्तांनी होमरूल चळवळीत भाग घेतला. डिसेंबर १९१६ च्या अधिवेशनाची पूर्वतयारी म्हणून होमरूल चा प्रचार तीव्र करण्यात आला. टिळकांच्या होमरूल लिगने नवीन

परंपरा निर्माण केली. लोकमान्य टिळकांच्या भाषणातून धार्मिक आवाहनाचे उल्लेखही सापडत नाही. होमरूलच्या मागणीचे अधिष्ठान सर्वस्वी धर्मनिरपेक्ष होते. टिळक म्हणतात, ब्रिटिश परधर्मीय असल्यामुळे ते परकीय आहेत असे नव्हे, तर भारतीय समस्यांविषयी त्यांना कळवळा नाही म्हणून ते परकीय आहेत. या देशाच्या फायद्यासाठी जर एखादा काही करत असेल तर तो मुसलमान किंवा इंग्रज असला तरी तो परकीय नाही.''[९] केसरी आणि मराठा या वृत्तपत्रातूनही होमरूलचा प्रचार होत होता.

* होमरूल चळवळीने ग्रामपंचायती, नगरपालिका, जिल्हा परिषद, प्रांतिक शासन आणि राष्ट्रीय शासन या सर्व स्तरावर स्वायत्तता मागितली.

- संपूर्ण स्वराज्य ही मागणी व ब्रिटिश साम्राज्याचे एक घटक राज्य म्हणून राहण्यास तरी असल्याचे बेझंट यांनी सांगितले.
- साम्राज्यातील सर्वच राष्ट्रे स्वायत्त असावीत या सर्वांची एक विशाल साम्राज्य लोकसभा असावी त्यात भारताला इंग्लंडसह सर्व राष्ट्रांच्या बरोबरीचे समानतेचा तत्त्वावर आधारित प्रतिनिधीत्व मिळावे ही मागणी होमरूलने केली.
- टिळक आणि बेझंट यांनी चालविलेल्या या चळवळीमुळे ब्रिटिशांना राजकीय सुधारणा जाहीर करणे आवश्यक आहे.
- ब्रिटिश मजूर पक्षाने १९१८ मधे भारताची होमरूल ची मागणी मान्य करावी असा ठराव केला.

* १९१९ च्या मॉन्टेंग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायद्यात भारतीयांना टप्प्याटप्प्याने स्वराज्य देण्याचा सरकारचा विचार असल्याचे जाहीर करण्यात आले.

### हिंदू-मुस्लीम ऐक्याचा लखनौ करार

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीपूर्वी कॉंग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यात समन्वय व्हावा या दृष्टीने राष्ट्रीय सभेने (कॉंग्रेसने) महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. १९०७ च्या सुरत अधिवेशनात कॉंग्रेसमधे जहालगट आणि मवाळगट अशी फूट पडली होती. जहालगट कॉंग्रेस बाहेर राहूनच आपले कार्य करत होता. होमरूल चळवळीचा जोर वाढल्याने जहालांचे वर्चस्व वाढले होते. १९१६ मधे दुंभगलेल्या नेमस्त आणि जहालांना एकत्र आणून मतैक्य झाले ते लखनौ अधिवेशनात. या अधिवेशनात कॉंग्रेस आणि मुस्लीम लिग यांच्यात राजकीय मागण्यांसाठी एकजूट झाली. समान उद्दिष्टांसाठी दोन्ही संघटना परस्पर सहकार्य करण्यास तयार झाल्या. त्यामुळे १९१६ चे लखनौ अधिवेशन ऐतिहासिक ठरले. Luck Now is in Lucknow [१०] असे टिळकांनी उद्‌गार काढले. कॉंग्रेस अधिवेशनाबरोबरच मुस्लीम लिगने आपले अधिवेशन घेतले आणि कॉंग्रेस आणि मुस्लिम लिग यांच्या संयुक्त समितीने तयार केलेली राजकीय सुधारणांच्या मागणीची योजना दोन्ही संघटनांच्या अधिवेशनात मंजूर करण्यात आली. आपल्याला जेव्हा त्रयस्थांशी (परकीय) संघर्ष करावयाचा असतो तेव्हा या व्यासपीठावर आपले ऐक्य राहणे महत्त्वाचे आहे. वंश, धर्म व राजकीय विचारांच्या छटा यांच्याबाबतीत आपले ऐक्य असले पाहिजे असे टिळकांनी ठामपणे सांगितले.[११] राष्ट्रीय कॉंग्रेसचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी एक छोटी एकसंघ एक छोटी एकसंघ कार्यसमिती नेमण्यात आली. या समितीने राष्ट्रीय दैनंदिन कामकाज पहावे व वार्षिक अधिवेशनात मंजूर झालेल्या ठरावांच्या अंमलबजावणीची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात यावी असा ठराव मांडण्यात आला, पण तो नेमस्तांनी मंजूर केला नाही. तो मंजूर झाला असता तर राष्ट्रीय सभेचे केवळ चर्चा करणारी एक संघटना असे स्वरूप जाऊन सातत्याने चळवळ चालविण्याची क्षमता असलेल्या संघटनेत तिचे रूपांतर झाले असते.[१२] या अदिवेशनात घटनात्मक सुधारणांची एक योजना बनविण्यात आली आणि १९ स्मरण पत्रांद्वारा तत्कालीन राजकीय विचारांना निश्चित रूप देण्यात आले.[१३] लो.टिळक म्हणाले, 'लखनौला हिंदू मुसलमान तसेच प्रागतिक राष्ट्रीय एक होऊन चळवळ करण्यास बांधले गेले हे दृश्य पाहून दैव आता उजाडले आणि लखनौने आपले लकनाऊ हे नाव यथार्थ केले.[१४] लखनौ करारातील मुख्य कलमे खालीलप्रमाणे - १) भारत मंत्र्याचे मंडळ बरखास्त करावे. वसाहतींचे अध्यक्षपद भारतमंत्र्याला द्यावे. स्वयंशासित वसाहतींचे संबंध प्रत्यक्षपणे फक्त भारत शासनाशी असावेत. २) व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळातील निम्मे सदस्य भारतीय असावेत व ते केंद्रीय विधीमंडळाने नियुक्त केलेले असावेत. ३) केंद्रीय विधीमंडळात ४ सभासद निर्वाचित असावे त्यापैकी १/३ सभासद मुसलमानांनी आपल्या स्वतंत्र मतदार संघातून निर्वाचित केलेले असावे. ४) प्रांतिक विधीमंडळात ४/५ सभासद निर्वाचित असावे त्यापैकी मुसलमान सभासदांचे प्रमाण लखनौ कराराप्रमाणे असावे. ५) प्रांतांना स्वायत्त शासनाचे अधिकार असावे, ६) संरक्षण व परराष्ट्र धोरण हे दोन विषय वगळता इतर विषयांबाबत केंद्रीय शासनानवर केंद्रीय विधीमंडळाचा ताबा असावा. लखनौ कराराचा पहिला भाग राजकीय अधिकारांच्या मागणीचा होता आणि दुसरा भाग विधीमंडळातील मुस्लीम प्रतिनिधीला संबंधी होता. मुसलमानांच्या विभक्त मतदार संघांना मान्यता देण्यात आली. ज्या प्रांतात मुसलमान अल्पसंख्यांक असतील तेथे त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिक प्रतिनिधीत्व दिले. ज्या प्रांतात मुसलमान बहुसंख्यांक असतील तेथे मुसलमानांची कमी प्रतिनिधीत्व मान्य करावे असे तत्त्वत: दोन्ही पक्षांनी मान्य केले. विधीमंडळामधे जातीय विषयावरील प्रस्तावाबाबत मुसलमानांच्या नकाराधिकार कॉंग्रेसने मान्य केला. विद्यापीठ, जमीनदार या सारख्या विशेष मतदारसंघातून मुसलमान उमेदवारांना निवडणूक लढविता येईल हे मान्य करण्यात आले.

लखनौ करारानुसार मुसलमानांच्या स्वतंत्र मतदारसंघाला मान्यता दिल्यासारखे होते. कॉंग्रेसने त्याला तत्त्वत: मान्यता दिली. भारतर हे एक राष्ट्रीय आहे. कॉंग्रेस ही संपूर्ण भारतीय

समाजाचे प्रतिनिधीत्व करणारी संगटना आहे. या काँग्रेसच्या भूमिकेला या मान्यतेमुळे तडा गेला पण व्यवहारी दृष्टीकोनातून राष्ट्रीय सामंज्यसासाठी नाईलाजाने तात्विक तडजोड केली होती. राजकीय ऐक्यासाठी काँग्रेस नेत्यांनी त्याग केला हे निर्विवाद आहे. हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी ही योजना म्हणजे भरभक्कम पायाच ठरावा अशी अपेक्षा होती. या ऐक्य कराराचे सर्व भारतीयांनी स्वागत केले. पण भविष्यात मुस्लिमांच्या मागण्या वाढत गेल्या. मुस्लिम लिगने या ठरावाचा उपयोग करून आपल्या समाजात वेगळेपणाची भावना वाढविली. पुढे झालेल्या फाळणीची ही नांदीच ठरली असे राजकीय विचारवंतांचे मत आहे.[१५]

होमरूल लिग आणि लखनौ करार या दोन्ही घटना भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाच्या घटना ठरल्या. या घटनांमुळे भारतीय जनतेला स्वातंत्र्याबद्दलची आस्था वाटू लागली. तरुणांचा सहभाग वाढला. होमरूल चळवळीने भारतीय स्वातंत्र्य लढा घराघरात पोहचला. म.गांधीजींना जनतेचा जो भरीव आणि भक्कम पाठिंबा पुढील काळात लाभला त्याचा पाया होमरूलने रचला गेला.

परदेशात ही भारतीय स्वातंत्र्यलढ्याची दखल घेतली गेली. आंतरराष्ट्रीय पातळीवर ब्रिटिशांवरील दबाव वाढू लागला. राजकीय हक्कांबद्दल जनता जागृत होत आहे, त्यांना भरीव सुधारणा देणे ब्रिटिश सरकारला भाग पडले. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे अनेक टप्पे आहेत. १९०५ पासून जहालांचा प्रभाव वाढून जनतेमध्ये ब्रिटिशांबद्दलचा असंतोष वाढून जहालांचा मार्ग योग्य असल्याचे दिसू लागले.

लखनौ कराराने काही काळ तरी हिंदू-मुस्लीम ऐक्य झाले. दोन्ही महत्त्वाच्या संघटना समान ध्येय्याने प्रेरित होऊन एकत्रित लढा उभारतील असा विश्वास निर्माण झाला असेच चित्र भविष्यात राहिले असते तर ब्रिटिशांना राज्य सांभाळताना अवघड झाले असते. स्वातंत्र्य लढा तीव्र बनला असता. या दोन्ही ऐतिहासिक घटनांतून सद्यस्थितीतील राजकारण व त्यातील विविध सामाजिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रेरणा मिळू शकते.

### तळटीपा

*१) बिपीनचंद्र, मृदुला मुखर्जी, आदित्य मुखर्जी, के.एन. पण्णिकर, सुचेता महाजन, इंडियाज स्गल फॉर इंडिपेन्डन्स, के.सागर पब्लिकेशनस, पुणे, २००८, पृष्ठ क्र. १७ (प्रास्ताविक)*

*२) डॉ. ग्रोव्हर बी.एल., डॉ.एन.के. बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास - एक नवीन मूल्यांकन, एस. चन्द ॲण्ड कंपनी, नवी दिल्ली, २००८, पृष्ठे क्र. ३६३, ३६४*

*३) ४) वरीलप्रमाणे (२ प्रमाणे)*

*५) भारतीय समाज विज्ञान कोश, खंड ३, पृ. ३८३, संपादक स.-- गर्गे, पुणे*

*६) डॉ. आचार्य धनंजय, आधुनिक भारत (१७५०-१९७१), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११, पृ.क्र. ४१९*

*७) वरीलप्रमाणे (६ प्रमाणे), पृष्ठ ४२०*

*८) बिपीनचंद्र, मृदुला मुखर्जी...., पृष्ठ क्र. १८४*

*९) ८ प्रमाणे, पृष्ठ क्र. १८५*

*१०) डॉ. धनंजय आचार्य (वरीलप्रमाणे), पृष्ठ क्र. ४१८*

*११) बिपीनचंद्र, मृदुला मुखर्जी, पृष्ठ क्र. १९०*

*१२) डॉ. ग्रोव्हर, बेल्हेकर (२ प्रमाणे), पृ.क्र. ३६७*

*१३) १२ प्रमाणे, पृ. ३६७*

*१४) भारतीय समाज विज्ञान कोश, खंड ४, पृ. २६३*

*१५) भारतीय समाज विज्ञान कोश, खंड ४, पृ. २६४*

### संदर्भ ग्रंथ


१) भारतीय समाज विज्ञान कोश, खंड ३,४,५

२) इंडियाज स्गल फॉर इंडिपेंडन्स बिपीनचंद्र

३) आधुनिक भारत, डॉ. धनंजय आचार्य

४) आधुनिक भारताचा इतिहास, एक नवीन मूल्यांकन - डॉ. ग्रोव्हर, डॉ. बेल्हेकर

५) लोकमान्य ते महात्मा, डॉ. सदानंद मोरे